Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2503I01S01V13P0007

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Mar'25
Issue–III(I), Volume–XIII

# जागतिकीकरण आणि मराठी वैदर्भीय कथा

*(सदानंद देशमुख यांच्या कथा साहित्याच्या संदर्भात)*

**मार्गदर्शक**
**प्रा. डॉ. सोपानदेव विठोबाजी पिसे**
सेवादल महिला महाविद्यालय, सक्करदरा, नागपूर

**संशोधक विद्यार्थी**
**वर्षा रवींद्र पाटील**
स्नातकोत्तर मराठी विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

**सारांश** :

जागतिकीकरणानंतरच्या मराठी वेदर्भीय कथेने मध्यमवर्गीयांचे त्यांच्या कल्पनेपलीकडचे विश्व साकारले आहे. 'खाऊजा ' संस्कृतीचा वाढता प्रभाव , मोडकळीस आलेली कृषी व्यवस्था ,खेड्यांचे झालेले शहरीकरण, सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांचा झालेला ऱ्हास याचे चित्रण सदानंद देशमुख यांच्या कथेतून दिसून येते. ढासळलेली कुटुंब व्यवस्था व एकटा पडलेला माणूस, खेड्यातील लोकांचे शहराकडे होणारे स्थलांतरण, यामुळे भकास पडलेली खेडी शहरातील चंगळवादाने प्रभावित झालेला तरुण वर्ग ,भौतिक सुख सोयीमुळे माणसाला आलेले एकाकीपण याचे वर्णन त्यांनी आपल्या कथेतून केले आहे. कुटुंबातील व समाजातील वाढत्या सत्ता संघर्षामुळे पीडित असलेला माणूस त्यांच्या कथेच्या केंद्रस्थानी आहे. स्त्रियांचे प्रश्न, कृषी जीवनातला प्रश्न आणि कोसळता गावगाडा यांचे वास्तव चित्रण सदानंद देशमुख यांच्या कथेतून आलेले आहे.

**बीज शब्द :**

जागतिकीकरण, भांडवलशाही, अर्थव्यवस्था, चंगळवाद, भोगवादी

**प्रस्तावना :**

"कथा या वाड्मय प्रकारातील कथा शब्द 'कथ' या संस्कृत धातूपासून बनलेला आहे.त्याचा अर्थ सांगणे, वर्णन करणे,असा आहे. मनोरंजन या प्रमुख उद्दिष्टप्रती कथा सांगितली जाते .याचबरोबर जिज्ञासापूर्ती ,कुतूहल पूर्ती ,उपदेश ,बोध, संस्कार ,धर्मप्रसार ,मतप्रचार ,तत्वचिंतन इत्यादी हेतूही कथेमागे असतात."[१] कथेचे दंतकथा , बोधकथा, नीतिकथा ,जातक कथा ,दृष्टांतकथा ,परिकथा ,लोककथा , साहसकथा असे अनेकविध प्रकार पडतात .१९६० नंतर मराठी साहित्यात अनेक प्रवाह अस्तित्वात आले .आदिवासी साहित्य, आंबेडकरवादी साहित्य ,दलित साहित्य ,स्त्रीवादी साहित्य ,ग्रामीण साहित्य, जनसाहित्य इत्यादी साहित्याचा उदय झाला. साठोत्तरी मराठी साहित्यात विशेषत्वाने समाज जीवनात बदल होऊ लागला .वाढती शहरे ,व्यापार ,उद्योगधंदे यात तंत्रज्ञानामुळे झालेले बदल ,शहरीकरण व सांस्कृतिक बदल इत्यादींचे पडसाद मराठी साहित्यात दिसू लागले. १९९० नंतर सर्वत्र जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले .जागतिकीकरणाच्या मानवी जीवनावर पडलेला प्रभावाचे चित्रण मराठी साहित्याद्वारा होऊ लागले .वैदर्भीय ग्रामीण साहित्यावर देखील जागतिकीकरणाचा प्रभाव पडू लागला यात प्रामुख्याने बाबाराव मुसळे, प्रतिभा इंगोले ,नामदेव कांबळे, आशा बगे,आसाराम लोमटे ,सदानंद मोरे यांच्या

कथांचा समावेश करता येईल. सदर शोध निबंधातून सदानंद देशमुख यांच्या वैदर्भीय कथांवर जागतिकीकरणाच्या पडलेल्या प्रभावाचा अभ्यास करणे हा हेतू आहे.

**सदानंद देशमुख यांचा परिचय :**

महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कवी, कथाकार ,कादंबरीकार आणि ललित गद्य लेखक सदानंद देशमुख यांचा जन्म विदर्भातील अमडापूर ,जिल्हा बुलढाणा येथे ३० जुलै १९५९रोजी शेतकरी कुटुंबात झाला . समाजातील अन्यायाला बळी पडलेला वर्ग हा त्यांच्या लेखनाचा केंद्रबिंदू आहे .त्यातील कर्जबाजारी शेतकरी व त्यांचे होणारे आर्थिक शोषण, कौटुंबिक आणि सामाजिक स्तरावरील सततची होणारे अवहेलना त्यांनी आपल्या कथांमधून व्यक्त केलेली आहे.

**सदानंद देशमुख यांचे जागतिकीकरणानंतरचे कथात्मक साहित्य :**

सदानंद देशमुख यांच्या सात कथासंग्रहातील कथांचे लेखन हे १९९०नंतरच्या काळातील आहे. या काळात भारताने नवीन आर्थिक धोरण स्वीकारले होते व या नव्या आर्थिक धोरणाचे बरे वाईट परिणाम इतर क्षेत्रांसोबतच साहित्यावर देखील झालेले दिसून येतात. सदानंद देशमुख स्वतः एका शेतकरी कुटुंबात जन्माला आले असल्यामुळे शेतकऱ्यांच्या समस्या व अडचणी त्यांनी प्रत्यक्ष पाहिल्याआहेत .त्यांनी जागतिकीकरणाचे समाजातील शोषित व पीडित समाजावर झालेले परिणाम आपल्या कथासंग्रहाच्या माध्यमातून चित्रित केले आहे .सदानंद देशमुख यांचे 'लचांड'(२००५,)' रगडा '(२००६),' खुंदळघास'( २००८),' महालोप'( २००९),'गाभूळगाथा'(२०१२) असे कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. सदानंद देशमुख यांनी आपल्या कथांमधून उध्वस्त झालेली ग्रामव्यवस्था, राजकारणातील स्थित्यंत,रे तंत्रज्ञानातील बदलामुळे उद्योग व व्यापारधंद्यात झालेले बदल ,भौतिक सुख, वाढलेला चंगळवाद यामुळे आळशी झालेला माणूस याचे वर्णन केले आहे. यांत्रिकीकरणाचा परिणाम झाल्यामुळे बदललेली कृषी व्यवस्था त्यातून पर्यावरणाचा होणारा ऱ्हास या गोष्टींकडे माणूस स्वतःच्या स्वार्थाकरिता कशी डोळेझाक करतो याचे वर्णन त्यांनी उपरोक्त कथांमध्ये केले आहे. माणूस स्वार्थी झाला असून आज कुटुंब व समाजातून नीतिमूल्य कशी हद्दपार झाली आहेत याचे चित्रण या कथांमधून होते . खेडी ही खेडी राहिलेली नसून त्यात शहर घुसू लागले आहेत रोजगाराच्या संधी शहराकडे अधिक प्रमाणात उपलब्ध झाल्यामुळे माणसांचे लोंढे शहराकडे वळत आहेत. त्यामुळे खेडी आता ओस पडू लागली आहेत. अशिक्षित व अज्ञानी शेतकऱ्यांचा समाजातील स्वार्थी लोक ,जमीनदार, सावकार व भांडवलदार फायदा घेऊन त्यांच्या जमिनी हस्तगत करू पाहत आहेत. याचे प्रतिबिंब या कथेतून उमटत आहे. शेअर मार्केटचे वाढते प्रमाण, नीती मूल्यांचा ऱ्हास, भोगवादी वृत्ती ,सामाजिक बांधिलकी विषयी नसणारे भान इत्यादी स्थित्यंतरे हा जागतिकीकरणाचा परिणाम आहे. त्याचे चित्र सदानंद देशमुख यांनी आपल्या कथांमधून केले आहे. या सर्व कथांना बदलत्या ग्रामीण समाज वास्तवाची पार्श्वभूमी आहे .जागतिकीकरणाच्या गतिमान प्रक्रियेत गावगाडा उदास, भकास झाला आहे."[२]

"इ स.२००० नंतरची समकालीन ग्रामीण कथा अस्मानी आणि मानवी संकटाचे वास्तव मांडते. बेकारी,

महागाई ,भ्रष्टाचार ,स्त्रियांचे लैंगिक शोषण ,पर्यावरण, प्रदूषण ,चळवळ अशा अनेक समस्यांनी आजचा समाज ग्रासलेला आहे .याचे चित्र वऱ्हाडी कथासाहित्यामधून कथाकरांनी मांडले आहे"[३]

**भाषाशैली:**

सदानंद देशमुख वैदर्भीय लेखक आहेत. त्यामुळे त्यांच्या भाषेवर वऱ्हाडी बोलीचा प्रभाव दिसून येतो .त्यांनी आपल्या कथांमधून वऱ्हाडी भाषेतच लिखाण केले आहे .त्यांच्या कथेच्या शीर्षकातून हे लक्षात येते. सदानंद देशमुख यांनी वऱ्हाडी बोलीतील शब्द वाक्प्रचार व म्हणींचा केलेल्या वापर त्यांचे वऱ्हाडी बोलीवर असलेले प्रेम व्यक्त करते . वऱ्हाडीबोलीतील आशयघन शब्द देशमुखांच्या कथेचे वैभव आहेत." भूईत राबणाऱ्या माणसाला भुईपासून तोडणं म्हणजे थानपित्या लेकराले थानापासून दूर करणं" ,"तो तापट बैलासारखा थळथळा करत राहिला", "मावळतीला सूर्य लाल गोळा होऊन रुईच्या कडेवर ठेवल्यासारखा दिसत होता ." "तासात पेरला दाना किडा मुंग्यांनी टोक करून खावा ,तस झालं ",भाऊ वखरल्या भुईसारखा मऊ झाला पाऊस भोगल्या रानासारखा तो एकदम तरारून गेला," अशी कीर्ततरी अर्थसधन काव्यात्मक वाक्य आशय व्यक्त करणारी आहेत."[४]

**उद्देश:-**

१)सदानंद देशमुख यांच्या नव्वदोत्तरी वैदर्भीय कथांचा परिचय करून घेणे .

२)जागतिकीकरणाचा सदानंद देशमुख यांच्या वैदर्भीय मराठी कथेवर झालेल्या प्रभावाचा अभ्यास करणे.

३) जागतिकीकरणानंतरच्या सदानंद देशमुख यांच्या वैदर्भीय कथेतील लोक जीवनाचा शोध घेणे.

४)जागतिकीकरणानंतरच्या सदानंद देशमुख यांच्या वैदर्भीय कथेतील कृषी संस्कृतीचे बदलते स्वरूप अभ्यासणे.

५) जागतिकीकरणानंतरच्या वैदर्भीय कथेतील बदलत्या समाज जीवनाचा वेध घेणे.

**निष्कर्ष : -**

१)नव्वदोत्तरी वैदर्भीय कथेवर जागतिकीकरणाचा परिणाम झालेला दिसून येतो .

२) नवदोत्तरी वैदर्भीय कथा ही ग्रामीण जीवनाचा पट उलगडून दाखवणारी आहे.

३) नव्वदोतरी वैदर्भीय कथेतून सदानंद देशमुख यांनी समाज जीवनाचे वास्तवचित्रण मांडले आहे.

४) नव्वदोत्तरी वैदर्भीय कथा या समकालीन तत्वांचा आविष्कार करणाऱ्या आहेत.

**संदर्भ :-**

१) डॉ. रमेश माने ,प्रा .योगेश पाटील.( संपा.) ,'निवडक दहा कथा :आशय आणि स्वरूप', प्रशांत पब्लिकेशन ,नागपुर २०२२, पृष्ठ २३३

२)देशपांडे संजय,( संपा.),' नागरमोथा',' सदानंद देशमुख यांच्या निवडक कथा', मराठी विश्वकोश, नागपूर २९२२

३) डॉ .सुधाकर पंडितराव बोथीकर,' समकालीन कथालेखक',Aayushi Interdisciplinary research journal, special issue,Feb 2022, पृ.३५

४)देशपांडे संजय,( संपा.)'नागरमोथा', सदानंद देशमुख यांच्या निवडक कथा, मराठी विश्वकोश, नागपूर २०२२